


एकलव्य



बिरसा मुंडा


तंट्या भिल्ल


राघोजी भांगरे


राणी दुर्गावती


खाज्या नाईक


डॉ. गोविंद गारे


श्री. आप्पा शिंगाडे

नोंदणी क्र. : संस्था ३७६/८८
ट्रस्ट : एफ-४८६२/८८

# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

# अहवाल

## सन २०१६ - २०१७



५३/१ब, विनायक नगर, पिंपळे गुरव, पुणे - ६१.
फोन : (०२०) २७२८५१६३

**आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे**

# संस्थेचे पदाधिकारी



श्री. सीताराम जोशी
अध्यक्ष



श्री. नामदेव गांभिरे
कार्याध्यक्ष



श्री. एकनाथ बुरसे
उपाध्यक्ष



श्री. खेवजी भोईर
उपाध्यक्ष




श्री. सतीश लेंभे
सचिव



श्री. दुंदा मोरे
सह-सचिव



श्री. लक्ष्मण भालेकर
खजिनदार



श्री. रामचंद्र शेळकंदे
संचालक



श्री. गंगाराम सांगडे
संचालक



श्री. किसन भोजने
संचालक



श्री. सुदाम चपटे
संचालक



श्री. प्रशांत शिंगाडे
संचालक



श्री. गोविंद झांजरे
पदसिद्ध संचालक

# प्रास्ताविक

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र पुणे आज पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्थेचे संयुक्त विद्यमाने ३० वा गुणवंत आदिवासी विद्यार्थी पुरस्कार कार्यक्रम साजरा करत आहे. कार्यक्रमानिमित्त सन २०१६-२०१७ चा संस्थेचा अहवाल सादर करणेस आम्हास आनंद होत आहे.

चालु वर्षाचे कार्यक्रमांचा आढावा घेणेपूर्वी मागील महत्त्वाचे कार्यक्रमाची नोंद देखील घेणे गरजेचे वाटते. आपणांस कल्पना आहेच की, संस्थेने समाजाचे सर्वांगिण बाबींचा विचार करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

- **जनजागृती मेळावे :-** समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने महिला प्रबोधन शिबिर, ग्रामपंचायत सदस्यांसाठी मार्गदर्शन शिबीर, वनाधिकार कायद्यावर चर्चासत्र, माहिती अधिकार व पेसा कायदा यावर कार्यशाळा अशा प्रकारचे प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आले आहेत.
- **पुरस्कार :** कोणत्याही क्षेत्रात काम करत असतांनी मग शिक्षक असो, विद्यार्थी असो अथवा कार्यकर्ता असो त्याच्या कामाची पावती म्हणून पुरस्कार दिल्यास त्यांना त्यांचे काम करणेस अधिक बळ मिळत असते. म्हणून आपण शिक्षक पुरस्कार, विद्यार्थी पुरस्कार, आदिवासी भूषण पुरस्कार यासारखे पुरस्कार सुरु केले. आजपर्यंत डॉ. गोविंद गारे साहेबांपासून तर मधुकरराव पिचड, वाहरु सोनवणे, नजुबाई गावित , मनोहरराव देशमुख म्हणजेच सर्व क्षेत्रातील मान्यवरांना आपण आदिवसी भुषण या पुरस्काराने गौरविले आहे. तर श्री. ढोबळे, श्री. भुजबळ इ. शिक्षकांना आपण शिक्षक पुरस्काराने तर शासकिय आश्रमशाळा, कोहणे, शासकिय आश्रमशाळा केळी कोतुळ, शासकिय आश्रमशाळा राजुर, शासकिय आश्रमशाळा शेंडी या आश्रमशाळांना उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्काराने गौरविले आहे. विद्यार्थ्यांमध्ये तर आपण अनेक विद्यार्थ्यांना पुरस्कारीत केले आहे. त्यामध्ये तुषार गभाले, पुनम किरवे, निशा काटे, प्रतिक बांबळे, मयुरा गंभिरे, ऋतुजा गंभिरे ह्यांना स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्काराने गौरविले आहे.
- **शिक्षक कार्यशाळा :** आपण जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ व अकोले तालुक्यात शिक्षकांसाठी इंग्रजी, गणित, सायन्य तसेच व्यवस्थापन इ. विषयांसाठी नेहमीच कार्यशाळा घेतल्या आहेत.
- **विद्यार्थी कार्यशाळा :** आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना नेहमीच इंग्रजी व गणित या विषयांचे भय असते म्हणून आपण प्रत्येकवर्षी इ. १० वीचे विद्यार्थ्यांसाठी गणित व इंग्रजी विषयाचे कार्यशाळा घेत आलो.
- **स्पर्धा परिक्षा व व्यक्तिगत विकास :** स्पर्धा परिक्षा व व्यक्तिगत विकासासारखे कार्यशाळा देखील आपण पुणे शहर व ग्रामीण भागात घेतलेले आहेत.
- **आरोग्य :** संस्थेने आरोग्याचे दृष्टीने देखील शासनाचे विरुद्ध अनेकवेळा आवाज उठविला. तसेच मुलींसाठी आरोग्य तपासणी व मार्गदर्शन सारखे कार्यशाळा देखील घेतले आहेत.

याशिवाय कातकरी समाजचे विविध प्रश्न, आंदोलने, मोर्चे, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे कार्यक्रमात संस्था नेहमी अग्रस्थानी राहीली आहे.

### सन २०१६ - २०१७ मधील कार्यक्रम

- **गुणवंत आदिवासी विद्यार्थी सत्कार २०१६ :** संस्थेने पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्थेचे संयुक्त विद्यमाने एच.ए. हायस्कूल, पिंपरी, पुणे येथे २४ जुलै २०१६ रोजी कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमात विद्यार्थी सत्कारा बरोबरच विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपरच 'मन मे है विश्वास' हे विश्वास नांगरे पाटील, आय.पी.एस. लिखीत पुस्तक वाटप करणेत आले व प्रसिद्ध लेखक, संशोधक प्रा. हरी नरके यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमात शहरातील पुजा मारुती खामकर, १२ वी व रोशनी सिताराम मेमाणे, १० वी यांना सर्वोत्कृष्ट स्व. प्रतापराव देशमुख स्मृती पुरस्कार देऊन गौरविणेत आले तर ग्रामीण मधून रमेश हरिभाऊ धनकुटे १० वी व ज्योती पराजी बांबळे या विद्यार्थ्यांना रोख पुरस्कार, स्मृतीचिन्ह व पुस्तक भेट देऊन गौरविणेत आले. तसेच इतर ६० विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व पुस्तक देऊन गौरविणेत आले.

- **स्व. देवराम सखाराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार'** :- स्व. देवराम गंभिरे यांचे स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा १००% इ. १० वी चा निकाल लावलेबद्दल दिला जाणारा पुरस्कार ॲड मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजुर, ता. अकोले, येथे ९ ऑगस्ट २०१६ रोजी घेण्यात आला. मा. प्रा. हरी नरके सर, मा. सुरेश कोते, संचालक लिङ्गत पापड, रान-कवी तुकाराम धांडे, श्री. घोडे गुरुजी इ. मान्यवर व आदिवासी समाज कृती समितीचे सर्व सदस्य व गंभिरे कुटुंबिय यांचे उपस्थितीत 'शासकीय आश्रमशाळा केळी रुम्हणवाडी, ता. अकोले या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी यांनी रोख पुरस्कार, ट्राफी याचा स्विकार केला. याच कार्यक्रमात अकोले तालुक्यातील तरुण उद्योजक श्री. सतीश भांगरे व श्री. प्रशांत मेचकर यांचा तर विविध क्षेत्रात नैपुण्य मिळविलेल्या तरुणांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करणेत आला.

## परीक्षेला सामोरे जातानी

संस्थेतर्फे इ.१० वी चे विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविणेसाठी परीक्षेला सामोरे जातानी घ्यावयाची दक्षता म्हणून उपाध्यक्ष श्री.एकनाथ बुरसे व त्यांची टिम ह्यांनी झंझावाती दौरा जुन्नर, आंबेगाव, खेड व मावळ तालुक्यात घेऊन कार्यशाळा घेतल्या. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच तसेच इंग्रजी व गणित विषयाचे मार्गदर्शन तसेच परीक्षेला सामोरे जातानी यावर मार्गदर्शन केले. दि. ६ जानेवारी २०१७, दि. ७ जानेवारी २०१७ व २२ जानेवारी २०१७ रोजी घेण्यात आले. सदर उपक्रमास रोटरी क्लब ऑफ पिंपरी यांनी ८०० प्रश्नप्रत्रिका संचाची पुस्तके किंमत रु. ४८,०००/- देणगी दाखल दिली. रोटरीचे अध्यक्ष श्री. चिंतामणी अभ्यंकर, श्री. चंद्र सारेन, श्री. बाळासो हर्रे, श्री. भावे सो, श्री. सारंग माताडे यांचे उत्तम सहकार्य लाभले.

तर दुबई स्थित श्री. पराग देव व अर्चना देव यांनी २०० प्रश्नसंचाचे पुस्तकांसाठी रु. १२,०००/- तसेच सौ. सुनिता बुरसे यांनी ''आभाज ॲकेडेमी'' तर्फे १०,०००/- किंमतीचे २०० पुस्तक संच व बुद्धवासी चांगदेव बनसोडे यांचे स्मृतिप्रित्यर्थ सौ. आशा बनसोडे यांनी २०० पुस्तके अर्थात रु. १२,०००/- देऊन कार्यक्रम पार पाडण्यास सहकार्य केले. सदरचे कार्यक्रमास

| ठिकाण | विद्यार्थी | ठिकाण | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| शिवाजी विद्यालय, डेहणे | ८२ | शासकिय आश्रमशाळा, टोकावडे | ४२ |
| गाडगेबाबा आश्रमशाळा, ओतूर | ६२ | दांगट आश्रमशाळा, कोळेवाडी | ३६ |
| शासकिय आश्रमशाळा, गोहे बु. | ६० | शरद पवार विद्यालय, डिंभे | ४५ |
| न्यू इंग्लिश स्कूल, गोहे | ३२ | नंदकर आश्रमशाळा, फुलवडे | ५२ |
| श्रीरंग गभाळे विद्यालय, फुलवडे | ३६ | शासकिय आश्रमशाळा, राजपूर | ६५ |
| शासकिय आश्रमशाळा, तेरुंगण | ४५ | शिवशंकर विद्यालय, तळेघर | ४५ |
| न्यू इंग्लिश स्कूल, जांभोरी | ३५ | न्यू इंग्लिश स्कूल, चिखली | ३५ |
| अनुदानीत आश्रमशाळा, मालेगाव | ६५ | शासकिय आश्रमशाळा कोहिंडे | ४५ |
| शासकिय आश्रमशाळा, तळेरान | २३ | भिमाशंकर विद्यालय, आव्हाट | २७ |
| मळुदेवी विद्यालय, वाळद | ३० | शासकिय आश्रमशाळा, अहुपे | २२ |
| शासकिय आश्रमशाळा, चिखलगाव | ३५ | शासकिय आश्रमशाळा, आसाणे | २२ |
| कृष्णा यशवंत भालचिम विद्यालय, माळीण | १६ | न्यु इंग्लिश स्कूल, आसाणे | ०६ |
| पंढरीनाथ विद्यालय, पोखरी | ५२ | न्यु इंग्लिश स्कूल, बोरघर | ५५ |

सदर वर्गासाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे खालील तज्ञ शिक्षकांनी आपले योगदान दिले.

इंग्रजी :- श्रीमती दिपाली क्षीरसागर मॅडम, श्रीमती चारुता प्रभुदेसाई मॅडम, श्री. राजु गायकवाड सर, श्री. शैलेश बर्गेसर, श्रीमती निकुंभ सोनल मॅडम

गणित :- श्रीमती रुपाली माने मॅडम, श्रीमती आभा माने मॅडम, श्री. पडदुगे सर, श्री. दिलीप रावडे सर, श्री. घुले सर, श्री. दिनानाथ गोरेसर

परीक्षेस सामोरे जातांनी - श्री. एकनाथ बुरसेसर ह्यांनी मार्गदर्शन केले. सदरचे कार्यक्रमांस आदिवसाी समाज कृती समितीचे सर्व पदाधिकारी, संचालक व सदस्य उपस्थित होते.

सर्व कार्यक्रमांना जागा व सर्व सुविधा पुरविले बद्दल मा. मुख्याध्यापक व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी अनुक्रमे - शासकिय आश्रमशाळा गोहे(खु), राजपूर, चिखलगाव, संत गाडगेबाबा आश्रमशाळा, ओतूर, अनुदानित आश्रमशाळा फुलवडे, मालेगाव, शिवाजी विद्यालय, डेहणे व कृष्णा यशवंत भालचिम विद्यालय, माळीण ह्यांचे ही आभार.

या कार्यक्रमात सर्व विद्यालयांना डॉ. श्री. राजेंद्र भारुड, भा. प्र. से ह्यांनी लिहीलेले 'मी स्वप्न पाहीले'' हे आत्मचरित्र ह्या पुस्तकाचे प्रति ग्रंथालयासाठी व मुलांना प्रेरणा मिळावी यासाठी देण्यात आल्या. तर वेळेअभावी अकोले तालुक्यात वर्ग घेणे शक्य न झालेले सर्व आश्रमशाळांना प्रश्नपत्रिका संचाचे प्रति देण्यात आल्या.

**इतर उपक्रम :-** संस्थेने विविध विषयानुसार शासनास निवेदन / पत्र दिली. उदा.

१) मा. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे - आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात बँकीग सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत दि. ३०/७/२०१६

२) मा. जिल्हाधिकारी, पुणे - धरणग्रस्त आदिवासी शेतकऱ्यास त्यांचे जमिनीचा ताबा मिळणेबाबत, दि. ६/८/२०१६

३) मा. जिल्हाधिकारी, पुणे - बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थीनीवर झालेला लैंगिक अत्याचार दि. ७/११/२०१६

४) मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे - आदिवासी जमातीशी नामसदृष्य असलेल्या बिगर आदिवासी जातीचे लोकांचे ९/६/२०१७ रोजी होणारे अंदोलना बाबत

५) मा. जिल्हाधिकारी / मा. विभागीय आयुक्त, पुणे : आदिवासी भागातील पोलीस पाटील नियुक्ती / भरती बाबत

**आभार :-** अहवाल सालात काम करत असताना विविध मान्यवरांचे आम्हाला सहकार्य लाभले त्यामध्ये आर्थिक योगदान तसेच मोलाचे मार्गदर्शन हे ही महत्त्वाचे आहे. म्हणून

सर्वश्री प्रविण क्षीरसागर सो., श्री. बाळासाहेब डोळस साो, श्री. संजय आदिवंत साो, श्री. नितिन चिमटे साो, श्री. नामदेव बारापात्रे साो, श्री. दिलीप पावरा साो, श्री. सुभाष पावरा साो, श्री. विश्वमोहन शर्मा साो, श्री. प्रसाद भांगे साो, श्री. दिलीप काळे साो, श्री. काशिनाथ गांगुर्डे साो, श्री. शिरिष भांगरे साो, श्री. नवाळी साो यांनी अर्थसहाय्य तर प्रा. विजय पारधी सो., प्रा. हरी नरके सो., जेष्ठ विचारवंत, मा. सुरेश कोते सो. व रानकवी तुकाराम धांडे सो. यांचे मार्गदर्शन यांचेही आभार. त्याचबरोबर विद्यार्थी सत्कार कार्यक्रमास रोख बक्षिस देऊन कार्यक्रमात उत्साह भरणारे सर्वश्री गोरखनाथ शिन्देसर, सुदाम मराडे सो., गोविंद झांजरे साो, सौ. आशा दाते, देवजी घोडे साो, दुंदा मोरे साो, नामदेव गंभिरे साो, राजेंद्र रेंगडे साो, सुदाम चपटे साो, गणपत लंघी साो, ठाकाजी मिलखे साो व संत ज्ञानेश्वर माऊली गॅस एजन्सीचे प्रो. नामदेव शेठ भांगरे यांचेही आभार!

ज्यांचे अमोल सहकार्य व परिश्रम या कामी लागतात ते आमचे संचालक मंडळ व सभासद, देणगीदार व हितचिंतक यांचेही आभार

धन्यवाद, जय आदिवासी!

संचालक मंडळाचे वतीने

**सीताराम जोशी**
अध्यक्ष

**नामदेव गंभिरे**
कार्याध्यक्ष

# ।। दखन्नची राणी ।।

समीदंरापासून, पर्वतापर्यंत,
नभाशी खेळण्याचा हा खेळ
शहरांशी नाते जडते मनी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी।।

लांबलांब रस्ते आणिक उंच इमारती
चढता वळणे थकुनी जाई
पार करुनी बोगदे, नवी गती आणी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी।।

गरीब थोर-अंधळे नी भिकारी
बघताना तुम्ही मी सर्वांचा कैवारी
विविध व्यवसायिक, चाकरमाने अन बुटपॉलिशवाले
मधेच कुणीतरी कर्मठ पुढारी-गांजतो मलाभारी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी।।


कुणीतरी आसामी निसर्गाची जाणी किमया
रेल्वेमंडळ मात्र जमवी माया
एक अनामिक होतो क्षणाचा मालक
कवडीभर रुबाब करतो दीनालाही गारद
जो शेरास शव्वाशेर तोच माझा धनी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी।।


बलदंड झाल फुगा उडू लागला वरी
एक रुपयासाठी कुणी हसरे मुखकरी
तुम्ही स्वकियांकडे, कुणी व्यवसाय, चाकरीस जाई,
कुणी भामटा मात्र आमचं ऐक्य हिरावुन घेई
कुणी बेवडा नशेत राज्य करी,
श्रीमुखात बसता तेव्हा आठवे पुरी कहानी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी ।।

पुर्वीच आठवतं मला अनेक जन काव्य करी
आता मात्र ऐकु येतात शिव्या शापाची मांदियाळी
काय म्हणावं? पेशवाई का मागलाई।
तेही म्हणायची सोय नाही
सर्वत्र स्वार्थी आन आपमतलबी नाही कुणी गुणी
म्हणुनच मी आहे दखन्नची राणी।।

तुम्ही करा आप आपली गणितं
मी गाईन भारत मातेचं गीत
उंच पहाडी गर्द झाली
नेसुन हिरवी साडी
न्याहाळत बसते माझे रुप
नशीब माझं कुणाच्या भाळी
किती वर्णावी पुरी न होई माझी कर्मकहाणी
म्हणूनच मी आहे दखन्नची राणी।।

**श्री. एन. डी. गंभिरे**





**श्री. दुंदा मोरे**
मानद सचिव, आदिवासी पतसंस्था व
सहसचिव,
आदिवासी समाज कृती समिती, महा. पुणे

# प्रवास

**आपणास विश्वास बसत नसतो की एखादा दिवस हा निश्चितच फार मोठा बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरतो. नाहीना विश्वास बसत.. बघा..**

जानेवारी १९८५ चा दिवस, डॉ.गोविंद गारे साहेबांनी त्यांच्या ऑफीसवर कार्यकर्त्यांची एक मीटिंग बोलविली होती. मिटींगचा विषय होता 'समाजाची एक पतसंस्था स्थापन करणे'. प्रतापराव देशमुख ह्यांचे नेतृत्त्वाखाली पतसंस्थेची उभारणी करण्याचे निश्चित झाले व त्वरीत कामाला सुरुवात करणेचे निश्चित झाले.

पुण्यातील सर्व विभागाची माहिती त्या त्या भागातील कार्यकर्त्यांमार्फत मिळविण्यात आली. हा, हा म्हणता प्रतापराव देशमुख व सहकाऱ्यांनी पुण्याचा कानाकोपरा पिंजून काढला व २४ मार्चला १९८६ रोजी पतसंस्थेची स्थापना झाली. हीच संस्था सध्या कार्यरत आहे.

हाच विश्वास व अभ्यास पुढेही उपयोगी आणायचा आणि तो आला ही. सामाजिक कार्यासाठी आदिवासी समाज कृती समितीची स्थापना झाली निमित्त होते 'बोगस आदिवासींची शासकिय सेवेतील संख्या'. पुण्याच्या वेगवेगळ्या विभागातील समाजाचा विचार करणारी विविध क्षेत्रातील मंडळींचा समावेश असलेली व मुख्य हेतू 'मागे वळून पहा' असणारी कार्यकर्त्यांची टीम सिताराम जोशी च्या अध्यक्षतेखाली काम करु लागली.

पहाता पहाता २५ वर्षांचा कार्यकाल कधी उलटून गेला कळलेही नाही, काय काम केले ह्याचा विचार करत गेलो तर अनेक प्रसंग समोर दिसू लागले. अखंड पुणे व नगर जिल्ह्याचा आदिवासी भाग पिंजून काढला. अडचणी अनेक दिसू लागल्या आणि लक्ष तर द्यावे लागणार मग सुरुवात करावयाची कोठून ह्याच्यावर चर्चा सुरु झाली व जसे जमेल तसे चालत राहिले. मग कुठे धान्य वाटप, कपडे वाटप, आरोग्य शिबीर असे अनेकविध कार्यक्रम चालू झाले. समाजासमोरील अडचणी संपता संपेनात पण न थांबता टिम काम करतच राहिली.

मध्येच, कातकरी समाजाचा सर्व्हे आप्पा शिंगाडे ह्यांनी हातात घेतला व लक्षात आले की आपल्या समाजापेक्षा कातकरी समाजासमोर अडचणींचा डोंगर खूपच मोठा आहे. कातकरी समाजाची देशात ओळख देखील नाही मग सुरुवात झाली रेशनींगचे कार्ड काढण्यापासून. त्यानंतर कातकरी समाजातील काही कार्यकर्ते हेरुन त्यांना प्रवाहात आणले व त्यांचा एक गट कार्यरत झाला. आता कुठे घरकूल, मच्छिमारीसाठी जाळी असे विविध मार्गाने कातकरी समाजासाठीचे काम चालू आहे.

पूर्वी आदिवासी भागातील वैद्यकिय सुविधांचा विचार केला तर जास्तीत जास्त रुग्णांना मोठ्या आजारासाठी पुण्याशिवाय पर्याय नसे आणि जेव्हा तो रुग्ण उपचारासाठी पुण्यात आणला जात असे तेव्हा त्याची प्रकृती ही अतिशय खालावलेली असायची मग त्यातील बहुतांशी रुग हे दगावत पण त्यांचा मृतदेह आदिवासी भागात नेणे ही मोठ्या जिकीरीची बाब असे त्याचा विचार करुन संस्थेने रुग्णवाहिका सेवा आदिवासींसाठी सुरु केली.

सध्याच्या युगात माणूस किंवा एखादे कुटुंबाचा शोध शहरात घेणे अतिशय सोपे झालेले आहे पण २० वर्षांपूर्वी नोकरी निमित्त शहरात स्थायिक झालेले कुटुंब हे फार कमी प्रमाणात एकमेकांचे संपर्कात येत त्यामुळे मुला-मुलींची लग्न जमविणे ही अडचणीचे होऊ लागले व हाच विचार घेऊन प्रेरणा वधु-वर सुचक मंडळाची स्थापना झाली, आजही महिला विभाग हे कार्य अविरत करत आहे.

सीताराम जोशींची टिम ही बहुतांशी विविध वसतीगृहात राहून शिक्षण घेतलेली टिम त्यामुळे शिक्षणाची आस्था ही मुळत: त्यांच्यात जास्त होती आणि त्यासाठी त्यांचे मन नेहमी स्वत:चे शिक्षण कसे झाले, काय अडचणी आल्या या विषयावर चर्चा करायची. पण नेमके काय करायचे कारण त्यासाठी विविध विभागांची गरज होती व नेमके असे लक्षात आले की आदिवासी आश्रमशाळा असो की अन्य शाळा विद्यार्थी हे इंग्रजी, गणित व शास्त्र ह्या विषयात अनुत्तीर्ण होतात. पर्यायाने त्यांचे शैक्षणिक जीवन येथेच संपते व मग जर असे असेल तर आपण शैक्षणिक बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे आणि एकदा एक गोष्ट निश्चित केली की टिम ते केल्याशिवाय थांबत नसे. मग सुरु झाला इंग्रजी, गणित, शास्त्र या विषयांच्या कार्यशाळांचे प्रवास आणि हा प्रवास निरंतर चालू आहे आणि हो, सर्वात जास्त समाधान टिमला शिक्षणात मिळू लागले. कालानुरुप बदल करत ही टिम शिक्षण क्षेत्रात काम करत आहे.

जसे एखाद्या कुटुंबावर सुखाबरोबर दु:खाचे प्रसंग येतात व त्या प्रसंगातून सुद्धा कुटुंब सावरते व पुन्हा नित्याच्याकामाला लागते तसेच संस्थेचेही झाले. संस्थेचे खंदे कार्यकर्ते तसेच मार्गदर्शक असलेले असे प्रतापराव देशमुख, आप्पा शिंगाडे व नंतर डॉ.गोविंद गारे अशा महान विभुतींच्या निधनाने संस्थेची टिम वेळोवेळी निराश झाली पण पुन्हा नव्या जोमाने आपले कार्य करत राहिली.

ज्या क्षेत्रावर आपण लक्ष केंद्रित करतो तेथे प्रोत्साहन देणे देखील गरजेचे असते म्हणून सुरुवातीचे काळात फक्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरापूरते मर्यादित असणारे विद्यार्थी पुरस्काराची व्याप्ती पुणे व नगर जिल्ह्यासाठी सुरु करणेत आली. त्याला जोड म्हणून टिमने रोख बक्षिसे देखील सुरु केली व म्हणता म्हणता विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. मग त्यात पुन्हा भर पडली व श्री. रामचंद्र शेळकंदे ह्यांनी शिक्षकांसाठी तर श्री. नामदेव गंभिरे यांनी अकोले तालुक्यातील आश्रमशाळेसाठी पुरस्कार जाहीर केले व जिथे कमी तिथे आम्ही ही उक्ती खरी केली.

काळानुरुप समाजात बदल घडत गेले. विविध विषयावर काम करणेसाठी विविध संघटना उभ्या राहिल्या. त्यांचे हाकेला 'ओ' देणारी पण स्वत:चे कार्य अविरत चालु ठेवणारी सीताराम जोशींची टिम आपले शैक्षणिक कार्य मात्र करतच राहिली व करत राहील.

सलग २७-२८ वर्ष काम करणाऱ्या टिममध्ये आता काही शिलेदार वयाची साठी ओलांडून गेले तर काही साठीच्या जवळ पोहोचले आहेत. आता टिमला गरज आहे नीवन शिलेदार पुढे पाठविण्याची आणि त्यांना मार्गदर्शन करत खऱ्या अर्थाने नवीन सुशिक्षीत समाज घडविण्याची.

हे सर्व करत असतांनाही वेगवेगळे क्षेत्रातील दानशूर व्यक्ति तसेच संस्थांनी टिमला योगदान दिले, कारण त्यांच्या योगदानाशिवाय हे सर्व होऊच शकत नव्हते. त्यामुळे त्या सर्वांचे ऋणात रहाण्याचे संस्थेची, टिमची इच्छा आहे.

# बातमी - आदिवासी समाजाची महान संस्कृती जपा -प्रा. हरी नरके

राजुर (प्रतिनिधी) माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत १००% निकाल प्राप्त केलेल्या आश्रम शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच शासकीय आश्रमशाळा केळी रुम्हणवाडी या आश्रमशाळेस स्व. देवराम सखाराम गंभिरे, उत्कृष्ठ आश्रमशाळा पुरस्काराने प्रा. हरी नरके, जेष्ठ विचारवंत यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. रोख रक्कम रुपये ११,०००/- मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन या शाळेचे मुख्याध्यापक मा. कांबळे ए. एम. यांनी त्याचे सहाकाऱ्यास हा पुरस्कार स्विकारला.

अतिशय दुर्गम भागात व प्रतिकुल परिस्थितीत कमी सुख सुविधा असूनही आदिवासी विद्यार्थ्यांनी उत्तम यशाची परंपरा कायम ठेवत यश संपादन केले आहे. अशीच जिद्द कायम ठेऊन पुढील शैक्षणिक वाटचाल कायम ठेवावी; त्याचबरोबर आदिवासी समाजची दैदिप्यमान संस्कृतरी ठिकविणेचीही जबाबदारी युवकांनी स्विकारली पाहिजे. या समाजचे आद्य क्रांतीकाक वीर बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल, रोणी दुर्गावती, राघोजी भांगेरे, खाज्या नाईक, डॉ. गोविंद गारे आदिंच्या कार्याचा उल्लेख केला.

पूर्वीच्या काळी जाती व्यवस्थेमध्ये खालच्या जातीतुन उच्च जातीकडे जाण्याचा कल होता. मात्र आता उच्च जातीतील समाजवर्ग आरक्षण मिळविण्याकरीता स्वतःला मागास ठरवून Down ward mobility ची प्रक्रिया सुरु असून, मागासवर्गीय समाजाच्या हक्कावर गंडांतर आणण्याचे षडयंत्र असल्याचे रोख ठोक भाकित प्रा. हरि नरके यांनी केले.

या उपक्रमाचे तसेच आदिवासी समाजकृती समितीचे कार्याध्यक्ष नामदेव गंभिरे हे वरील आश्रमशाळेचे विद्यार्थी असून, त्यांनी उच्च शिक्षण घेऊन आता पुणे महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी परिस्थितीची जाणिव ठेवून पुन्हा आश्रमशाळेकडे व पर्यायाने समाजाचे ऋण व्यक्त करणेसाठी हा उपक्रम चालु केला असून, हे पाचवे वर्ष आहे. यापूर्वी हा पुरस्कार कोहणे केळी कोतुळ, मान्हेरे व राजुर या आश्रमशाळांनी पटकाविला आहे.

मा. सुरेश कोते, संचालक लिज्जत पापड, पुणे, एकनाथ बुरसे, उपाध्यक्ष, आदिवासी समाज कृती समिती, पुणे एस. बी. वाघुले निवृत्त मुख्याध्यापक, आश्रमशाळा केळीरुम्हणवाडी, बाबासाहेब देशमुख, प्राचार्य, ॲड. मनोहरराव देशमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करुन इयत्ता १० वी मध्ये उत्तम गुण मिळविलेल्या साबळे राघव ८८.७०%, गभाले रविंद्र ८८.६०% व गभाले विकास ८८.२०% यांचा मान्यवरांच्या हस्ते ''मन में है विश्वास'' लिखीत मा. विश्वास नांगरे पाटील (आय.पी.एस.) यांचे पुस्तक देऊन सन्मानीत केले.

या प्रसंगी कवी तुकाराम धांडे यांनी त्यांच्या अस्सल रान कविता आदिवासी बोलीत साजऱ्या करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. दुंदा मोरे सहसचिव यांनी सुत्रसंचालन केले तर खेवजी भोईर यांनी आभार मानले.

# ॥ सहज एकदा फेरफटका मारताना ॥

वाटेत **''राग''** भेटला मला पाहून म्हणाला....
काय राव, आठवण काढत नाही हल्ली?
मी म्हणालो अरे नुकताच **''संयम''** पाळलाय घरात
आणि **''माया''** पण माहेरपणाला आली आहे.
तसं तोंड फिरवून तो निघूनच गेला...!!

पुढे बाजारात **''चिडचिड''** उभी दिसली गर्दीत,
खरं तर ही माझी बालमैत्रीण
पण पुढे कॉलेजत **''अक्कल''** नावाचा मित्र
मिळाला आणि हिच्याशी संपर्क तुटला...!!
आज मला पाहून म्हणाली अरे
**''कटकट''** आणि **''वैताग''**ची काय खबरबात?
मी म्हटलं, काही कल्पना नाही बुवा...
हल्ली मी **''भक्ती''** बरोबर सख्य केलय
त्यामुळे **''आनंदा''**त आहे अगदी..!!

पुढे जवळच्याच बागेत **''कंटाळा''**
झोपा काढताना दिसला माझं अन् त्याच हाडवैर..
अगदी ३६ चा आकडा म्हणाना...
त्यामुळे मला साधी ओळख दाखवायाचाही
त्याने चक्क **''आळस''** केला...!!
मी ही मग मुद्दाम **''गडबडी''**कडे लिफ्ट मागितली
आणि तिथून सटकलो..!!

पुढे एका वळणावर **''दुःख''** भेटलं,
मला पाहताच म्हणालं
''अरे ये, तुझीच वाट पहात होतो''.
मी म्हणालो, ''अरे वाट पहात होतास कि
वाट लावायच्या तयारीतच होतास?
आणि माझ्या बायकोपेक्षा
तूच जास्त वाट बघतोस कि रे माझी
तसं **''लाजून''** ते म्हणालं,
''अरे मी पाचवीलाच पडलो (पाचवीला पुजलो) तुझ्या वर्गात.
कसं काय सर्व? घरचे मजेत ना?
मी म्हणालो, **''छान''** चाललय सगळं..
**''श्रद्धा''** आणि **''विश्वास''** असे दोन भाडेकरु ठेवलेत घरात
त्यांच्या मदतीने मस्त चाललंय. तू नको **''काळजी''** करुस.
हे ऐकल्यावर **''ओशाळलं''** आणि निघून गेलं..!!


थोडं पुढे गेलो तोच **''सुख''** लांब उभं दिसलं
तिथूनच मला खुणावत होतं,
धावत ये नाहीतर मी चाललो मला उशीर होतोय..
मी म्हणालो, ''अरे कळायला लागल्यापासून
तुझ्याच तर मागे धावतोय उर फुटे पर्यंत,
आणि त्यामुळेच आयुष्याची फरफट झालीय...
एकदा दोनदा भेटलास पण **'दुःख'** आणि 'तू'
साटलोट करुन मला एकटं पाडलत...दर वेळी.
आता तूच काय तुझी **''अपेक्षा''** पण नकोय मला.
मी शोधलीय माझी **''शांती''** आणि
घराचं नावच **''समाधान''** ठेवलंय...!!

**श्री. खेवजी भोईर**



# आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षण बंद होणार का?

## उच्च न्यायालयात शासनाची माहिती, दुर्गम भागात पहिली ते चौथीपर्यंत वर्ग बंद करणार



पुणे, दि. १६ - दहा वर्षापर्यंतच्या मुलांनी पालकांबरोबर राहणे आवश्यक आहे. आरटीई नुसार ३ किमीच्या आत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या शाळा उपलब्ध आहेत. त्यामुळे दुर्गम आदिवासी भागातील इयत्ता पहिले ते चौथी पर्यंतचे वर्ग बंद करण्याबाबतची कार्यवाही आदिवासी विकास विभागाने सुरु केली असल्याची धक्कादायक माहिती शासनाने उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीवेळी दिली.

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे सर्पदंश, आजारपण, अपघात, पाण्यात बुडून, आकस्मिक व इतर अन्य कारणाने मोठ्या प्रमाणावर मृत्यू झालेले आहेत. यासंदर्भात रवींद्र तळपे यांनी शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूच्या संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर उच्च न्यायालयाने आश्रमशाळांमध्ये निवासी सुविधा व इतर मूलभूत सुविधा पुरविण्याचे निर्देश राज्य शासनाला दिलेले आहेत.

विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी शैक्षणिक वर्षात दोन वेळा नामांकित हॉस्पिटलकडून करून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच एएनएमच्या सेवा सर्व आश्रमशाळांना पुरविण्याबाबत आरोग्य विभागाला शासनामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. आपत्कालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा पथक स्थापन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने मृत्यू प्रकरणांच्या त्रैमासिक आढावा घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या वैद्यकिय उपचारांसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकाकडून संमतीपत्र घेण्यात यावे असे अप्पर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांनी कळविले आहे. तसेच अधिक्षिकांची पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली असून, त्याची लेखी परीक्षा घेण्यात आली. सुरक्षा रक्षक व स्वच्छता कर्मचारी यांची नियुक्ती नामांकित एजन्सीमार्फत करण्याचे प्रस्तावित असल्याचे शासनाने न्यायालयात सुनावणीच्या वेळी सांगितले. त्याचप्रमाणे आता सर्वत्र शाळा उपलब्ध असून, आदिवासी भागातील पहिली ते चौथीपर्यंतच्या शाळा बंद करण्याची कार्यवाही सुरू केल्याची माहिती न्यायालयात दिली.

यासंदर्भात याचिकाकर्ते रवींद्र तळपे म्हणाले, आदिवासी भागातील शिक्षण बंद करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांना देशोधडीला लावणारा आहे. विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांमध्ये प्रवेश देणार असल्याने विद्यार्थीच मिळत नसल्याचा कांगावा करून राज्यातील बहुतांश शासकीय आश्रमशाळा बंद करण्याचा घाट शासनाने घातला आहे. मात्र साडेचार लाख विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या आश्रमशाळांमधील फक्त २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकितमध्ये प्रवेश देण्याचे नियोजन आहे. म्हणजेच इतर विद्यार्थ्यांनी जवळच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे सूचित करण्यात आले आहे. तर दुसरीकडे मागील दोन वर्षांच्या कालावधीत जिल्हा परिषदेने आदिवासी भागातील शाळा पटसंख्येच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात बंद केल्या आहेत. शासनाच्या या चुकीच्या धोरणाला कडाडून विरोध केला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# आदिवासी भागातील शिक्षण बंद करण्याचा घाट

## राज्य शासनाची उच्च न्यायालयात माहिती

**पुणे : प्रतिनिधी**

दहा वर्षापर्यंतच्या मुलांनी पालकांबरोबर राहणे आवश्यक आहे. आरटीईनुसार ३ किमीच्या आत इ. १ ली ते ४ पर्यंतच्या शाळा उपलब्ध आहेत. त्यामुळे दुर्गम आदिवासी भागातील १ ते ४ पर्यंतचे वर्ग बंद करण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याची माहिती शासनाने उच्च न्यायालयात दिली आहे.

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे सर्पदंश, आजारपण, अपघात, पाण्यात बुडून, आकस्मिक व इतर अन्य कारणाने मोठ्या प्रमाणावर मृत्यू झालेले आहेत. यासंदर्भात रवींद्र उमाकांत तळपे यांनी शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूच्या संदर्भात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

याबाबत माहिती देताना याचिकाकर्ते तळपे म्हणाले, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा विषय अतिशय घातक आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमामध्ये प्रवेश देत असल्याचे कारण देत विद्यार्थीच मिळत नसल्याचा कांगावा करून राज्यातील बहुतांश शासकीय आश्रमशाळा बंद करण्याचा घाट शासनाने घातला आहे. मात्र साडेचार लाख विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या आश्रमशाळांमधील फक्त २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकितमध्ये प्रवेश देण्याचे नियोजन आहे. म्हणजेच इतर विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये प्रवेश घ्यावाच लागणार आहे.

# मागासवर्गीयांच्या हक्कावर गंडांतर आणण्याचे कारस्थान

## ा. हरी नरके ; उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्काराचे वितरण

रुंभोडी, ता. १९ : "राखीव ज्ञा मिळविण्यासाठी आता उच्च जातींची स्वतःला मागास ठरविण्याची ‌क्रिया सुरू आहे. मागासवर्गीयांच्या हक्कावर गंडांतर आणण्याचे हे कारस्थान आहे," अशी टीका महात्मा फुले विचाराचे अभ्यासक व लेखक प्रा. हरी नरके यांनी केला.

'देवराम सखाराम गंभिरे उत्कृष्ट आश्रमशाळा पुरस्कार' प्रा. नरके यांच्या हस्ते केळी रुम्हणवाडीच्या (ता. अकोले) आश्रमशाळेस देण्यात आला. ते म्हणाले, "दुर्गम भागात, प्रतिकूल परिस्थितीत आदिवासी विद्यार्थ्यांनी उत्तम यशाची परंपरा कायम ठेवली. अशीच जिद्द बाळगून पुढील शैक्षणिक वाटचाल यशस्वी करावी. आदिवासी समाजाची देदीप्यमान संस्कृती टिकविण्याची जबाबदारी तरुणांनी स्वीकारली पाहिजे."

दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुस्तके भेट देऊन सत्कार करण्यात आला. आदिवासी कृतिसमितीचे कार्याध्यक्ष नामदेव गंभिरे यांच्या पुढाकाराने पाच वर्षांपासून हा पुरस्कार दिला जातो. कार्यक्रमास 'लिज्जत पापड'चे कार्यकारी संचालक सुरेश कोते, कृतिसमितीचे उपाध्यक्ष एकनाथ बुरसे, निवृत्त मुख्याध्यापक एम. बी. वाघुले, राजूर महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमात कवी तुकाराम धांडे यांनी आदिवासी बोलीत कविता सादर केल्या. सूत्रसंचालन दुंदा मोरे यांनी केले. खेवजी भोईर यांनी आभार मानले.

# पुणे-पिंपरी-चिंचवड शहरातील संस्था/ संघटना

## संघटना

१) आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.
२) आदिवासी महासंघ, पुणे.
३) महाराष्ट्र आदिवासी सेवा संघ, पुणे.
४) सह्याद्री आदिवासी तरुण मंडळ, पिंपळे गुरव, पुणे.
५) आदिवासी भिमाशंकर तरुण मंडळ, धानोरी, पुणे.
६) आदिवासी विकास मित्र मंडळ, दिघी, पुणे.
७) पिंपरी-चिंचवड अनुसुचित जमाती शिक्षक व कर्मचारी संघटना, पुणे.
८) पुणे म.न.पा.अनुसुचित जमाती कर्मचारी संघटना, पुणे.
९) सह्याद्री आदिवासी तरुण मंडळ, धानोरी, पुणे.
१०) कोकणा-कोकणी आदिवासी समाज सेवा संघ.
११) परधान समाज संघटना, पुणे.
१२) आरक्षण हक्क कृती समिती, पुणे.
१३) नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन, पुणे.
१४) पुणे जिल्हा आदिवासी विद्यार्थी संघटना, पुणे.
१५) वीर विरसा मुंडा आदिवासी कर्मचारी संघटना, पुणे.
१६) आदिम यंग ग्लॅडिएटर्स, पुणे.

---

## बचत/स्वयंरोजगार गट

१) त्रिमुर्ती आदिवासी महिला बचत गट, दिघी.
२) प्रेरणा आदिवासी महिला स्वयंरोजगार संस्था, पुणे.
३) भिमाशंकर आदिवासी महिला स्वयंरोजगार संस्था, पुणे.
४) आदिशक्ती महिला बचत गट, दिघी.

---

## गृहनिर्माण संस्था

१) सह्याद्री आदिवासी गृहरचना संस्था, पद्मावती, पुणे.
२) श्री.शिवनेर सहकारी गृहरचना संस्था, दापोडी, पुणे.
३) त्रिमुर्ती आदिवासी सह.गृहरचना संस्था मर्या., दिघी.

---

**प्रेरणा वधु-वर सुचक मंडळ, नवी सांगवी, पुणे**

---

**पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पत संस्था मर्या., पुणे.**

# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

## "परीक्षेला सामोरे जाताना" कार्यशाळेचे विविध शाळांमध्ये आयोजन














# आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे



स्व. देवराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा' पुरस्कार
कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करतांना मान्यवर



स्व. देवराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा' पुरस्कार
कार्यक्रमास उपस्थितांना मार्गदर्शन करतांना प्रा. हरी नरके सर



स्व. देवराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा' पुरस्कार
कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व विद्यार्थी



स्व. देवराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा' पुरस्कार
कार्यक्रमात मनोगत व्यक्त करतांना डॉ. ऋतुजा गंभिरे



स्व. देवराम गंभिरे 'उत्कृष्ट आश्रमशाळा' पुरस्कार समयी
शासकिय आश्रमशाळा केळीसणसवाडीचे शिक्षक व गंभिरे कुटुंबीय



गुणवतं आदिवासी विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित मान्यवर